# सामाजिक न्याय : काल आणि आज

**प्रा. डॉ. विश्वनाथ आत्माराम देरेकार**
सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय,
ता. एटापल्ली, जिल्हा. गडचिरोली
ई—मेल: profvadarekar@gmail.com

---

***सारांश —***

*सामाजिक न्याय म्हणजे आर्थिक न्याय असे म्हणता येते. सामाजिक, आर्थिक समानतेसाठी प्रयत्न करणे म्हणजे सामाजिक न्यायासाठी प्रयत्न करणे होय. भारतीय संविधानाने अनेक प्रकारचे अधिकार दिलेले आहेत. त्याचा फायदा फक्त काही मुठभर लोकांना मिळत आहे. उपाशी माणसास त्यांचा फायदा होत नाही. अनेक लोकांना राहण्यास घर नाही. पोषक अन्न नाही. अनेक लोकाना रोजगार नाही. व्यवसायाची साधने नाहीत. अशा अनेक समस्यांनी ग्रस्त हा समाज आहे. काही प्रमाणात मागासवर्गीय समाजाची चूकसुद्धा आहे. आपल्या स्वार्थासाठी राजकीय नेत्यांचा किंवा पक्षांचा आधार घेतला जातो. मग काही लोकांच्या पदरात काही मिळते तर काही लोकांचे पदर खालीच असते. मग होतो विरोध. विरोध आला की योजना देण्यात भेदभाव केला जातो. मग ते शासकीय कार्यालय असो की राजकीय क्षेत्र.*

*सामाजिक न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी विवेकी, शहाणपणाचे मार्गच स्विकारल्या गेले पाहिजे. या मार्गाचा अवलंब करताना संतुलनाचे भान असले पाहिजे. समाजातील एका घटकावरील अन्याय दूर करताना इतरांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही संकल्पना आज अतिशय व्यापक अर्थाने स्विकारली जाते. यात सर्वांना समान संधी आहे. समाजाचे हित आहे. लोकशाही शासन व्यवस्था ही जीवनपद्धती आहे. राष्ट्राची प्रगती व विकास, व्यक्तीस सन्मानाचे स्थान आहे. या सर्वांचा समन्वय म्हणजे सामाजिक न्याय. समाजातील दुर्बल व कमकुवत घटक यांना विशेष मदत असावी. समाजातील महिलांच्या स्थानास योग्य न्याय द्यावा. सर्वांना समान संधी कायद्याने दिली असेल आणि समान मुलभूत अधिकार प्रदान केले असतील तरच सामाजिक न्याय म्हणता येईल.*

***बिज शब्द:*** *लोकशाही शासन व्यवस्था, समान मुलभूत अधिकार, भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका, जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, सामाजिक समता*

---

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका स्पष्ट करते की या संविधानाद्वारे भारतात सामाजिक न्यायावर आधारित समाजरचना निर्माण करावयाची आहे. त्यासाठी भारतीय संविधानामध्ये अनेक तरतुदी केलेल्या



Research Hub International Journal

आहेत. भारतातील निरक्षरता, स्वच्छता, आरोग्य व अज्ञान दूर करण्यासाठी तसेच महिलांना नोकरी, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, या सर्व क्षेत्रात समान संधी, मुलींचे अत्यल्प शिक्षणाचे प्रमाण लक्षात घेता त्यांना मोफत शिक्षण सक्तीचे व अनिवार्य करून स्त्रियांना समान पातळीवर आणण्यास तसेच निरक्षरता घालवण्यासाठी पावले उचलले आहे. भारतीय संविधानाच्या भाग ३ मध्ये मुलभूत अधिकारांची तरतुद करण्यात आली आहे. भारतीय संविधान म्हणजे सामाजिक न्यायाचा दस्तावेज आहे. सामाजिक न्याय अद्यापही वास्तवात उतरलेला आहे असे वाटत नाही. महाराष्ट्राच्या सामाजिक व प्रबोधनाच्या चळवळीत महात्मा ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सामाजिक क्रांतीकारकांना केंद्र स्थानी ठेवून समाज परिवर्तन व सामाजिक न्याय या सूत्राचा वापर करून सामाजिक समतेचा व्यापक दुष्टिकोन मांडलेला दिसून येते.

भारतीय समाजव्यवस्थेचा पाया हा जातिव्यवस्था, वर्ण, वर्गव्यवस्था व पुरुषप्रधान संस्कृतीवर होता. महात्मा ज्योतीराव फुले, राजश्री छत्रपती शाहू महाराज, महर्षी शिंदे या समाजसुधारकाने सत्यशोधकीय चळवळीच्या माध्यमातून समतेवर आधारीत समाजाची धारणा झाली पाहिजे असे सांगितले. शोषित घटकांसाठी समता व सामाजिक न्यायावर आधारीत मूलगामी समाज परिवर्तनाचा सिद्धांत मांडला.

**महात्मा ज्योतीराव फुले यांनी समतावादी** विचार व्यक्त करताना असे स्पष्ट केले की, शिक्षणापासून वंचित असलेल्यांना शिक्षण देण्याची योजना आहे. १८८२ मध्ये ब्रिटीशांनी नियुक्त केलेल्या हंटर कमिशन समोर साक्ष देताना महात्मा फुलेंनी ग्रामीण भागात आणि बहुजन व मागासलेल्या वर्गातील मुलांच्या शिक्षणाकडे सरकारने लक्ष द्यावे. शिक्षणात सत्यनिष्ठा, नीतिमद्रत्ता, प्रगतीपर विचार, व्यवहारज्ञान इ. गोष्टींवर भर दिला. शिक्षणातून मुलांना प्रगतीशील विचारांचे बाळकडू मिळाले पाहिजे, मनावर नैतिक संस्कार झाले पाहिजे अशा प्रकारची शिक्षणपद्धती अपेक्षित आहे, असे त्यांनी हंटर आयोगास सांगितले. १२ वर्षापर्यंतच्या सर्व मुला—मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारने करावी अशी मागणी करणारे म. ज्योतीराव फुले हे पहिले भारतीय होते.

भारतीय समाजाने स्त्रियांना समता आणि शिक्षण यांच्यापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे प्रमुख साधन आहे. स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने मुलाचे शिक्षण, कुटुंबाचे शिक्षण... म्हणजे स्त्री ही समाजाचे मूळ आहे. म्हणून स्त्री शिक्षणाचे महत्व म. ज्योतीराव फुले यांना पटले व त्यांनी स्त्री शिक्षणाची सुरूवात पुण्यात पहिली शाळा काढून केली. पत्नी सावित्रीबाई यांना स्वत: शिकवून शिक्षिका नेमले. त्या काळात प्रचंड विरोध होता पण ते डगमगले नाहीत. त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. स्त्रियांचा हीन दर्जा आणि त्यांचे अज्ञान, शारीरिक व मानसिक हाल यांच्याविरोधात देशात पहिला आवाज म. जोतीराव फुलेंनी उठविला. महात्मा फुले यांचा वारसा १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात महर्षी शिदे व राजश्री शाहू महाराज यांनी समर्थपणे चालविला. समाज परिवर्तनाची उर्मी घेऊन बहुजन दीन दलित समाजाच्या उद्धारासाठी राजश्री शाहू महाराजांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत कार्य केले. ज्या कालखंडात शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली, तो महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व असणारा व बहुजन समाजाचे अस्तित्व नाकारणारा कालखंड होता.

Research Hub International Journal

एका बाजूने ब्रिटीश साम्राज्यशाही तर दुसऱ्या बाजूने ब्राम्हणशाहीची मिरासदारी असे ते राजकीय चित्र होते. १८९४ मध्ये वयाच्या २० व्या वर्षी गादीवर आले व पुढील तीन दशके त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार चालविला व कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे हाती घेताच या सत्तेचा वापर सामाजिक न्यायावर आधारित राजकीय व्यवस्था कषी राबविता येईल याकडे लक्ष केंद्रित केले. उदा. मागासवर्गीस बहुजन समाजाचा विकास, शिक्षण, शिक्षणासाठी सवलती, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासकीय सेवेत समावेश या त्रीसूत्रीवर आधारित सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी शाहू महाराजांनी केली. सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण मागासवर्गीय तसेच बहुजन समाजाला शासकीय सेवेत आरक्षण, गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता येण्यासाठी शिष्यवृत्ती अस्पृष्य जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना मोठी मोठी पदे व अधिकाराच्या जागा बहाल केल्या. केवळ जन्माने उच्च वा श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुखाचे व समृद्धीचे जीवन जगता येते, तशाच प्रकारचे सुख, समृद्धी व प्रष्ठिेचे जीवन बहुजन व मागास वर्गीयांच्या वाटयात आले पाहिजे. यासाठी आपल्या संस्थानात ५० टक्के जागा राखीव करणारे हिंदूस्थानातील ६५० संस्थानांपैकी छत्रपती शाहू महाराज एकमेव संस्थानिक होते.

**महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज** यांची सामाजिक समतेची चळवळ २० व्या शतकात समर्थपणे चालविण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्यायावर आधारित सामाजिक परिवर्तन चळवळ, जाती अंताची चळवळ, स्त्री मुक्ती आणि समतेच्या निकषावर हिंदू धर्म व धर्मग्रंथाची कठोर व तर्कसंगत चिकित्सा केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समतेचा उदय होणार नसेल तर ते स्वातंत्र्य केवळ उच्च जातीपुरतेच मर्यादित ठरेल. तेव्हा जातीय अंताची चळवळ जोपर्यंत यशस्वी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्रकारची समता या समाजव्यवस्थेत येऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृष्यतेविरूद्ध जी चळवळ उभी केली ती जाती अंताच्या लढयातील एक भाग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक न्यायविषयक विचार स्वांतत्र्य, समता, व बंधुता या तीन आदर्श तत्त्वाबाबत रूसोने मांडलेल्या विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर फारच प्रभावीत झाले होते. त्यांचे चिंतन राजकीय लोकशाही, राजकीय हक्क, राज्य, समाजवाद यापुरते मर्यादित नव्हते. तर त्यांच्या चिंतनाची ओढ सामाजिक, आर्थिक क्षेत्रात न्याय व समता प्रस्थापित करून शोषणमुक्त आणि कौर्याचा अभाव असणारा समाज निर्माण करण्याकडे होता. ते अशा सामाजिक व्यवस्थेचे व समाजव्यवस्थेचे समर्थन करतात की, ज्यात मानवी जिवनाच्या सर्व क्षेत्रात व्यक्ती– व्यक्तीमधील संबंध हे न्यायपूर्ण असावेत. भारतीय समाजव्यवस्थेत आज कालबाह्य झालेल्या सामाजिक व आर्थिक संरचना मोडून काढण्याचा व बदलण्याचा घटनात्मक मार्ग म्हणजे सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित करणे होय.

**न्याय (Justice)** या संकल्पनेच्या 'सामाजिक न्याय' ही संकल्पना एक आयाम (पैलू) आहे. जस्टीस या शब्दाचे जस (jus) या शब्दात असून त्याचा शब्दश: अर्थ जोडणे व एकत्र बांधणे असा होतो. लोकांना बंधनकारक असणाऱ्या नियामांचा संच असा अर्थ 'जस' या संज्ञेतून सूचित होतो. हे नियम रूढीतून आलेले असोत वा विधी निर्माण प्रक्रियेतून आलेले असोत त्यांना न्यायालय मान्यता

Research Hub International Journal

देतात व ते अंमलात आणतात. हे नियम माणसाचा माणसाशी मेळ घालून मानवी संबंधाशी संघटीत व्यवस्था उभी करतात. शेकडो वर्षापासूनच्या परंपरांमुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारीत असणाऱ्या भारतीय समाजात आज सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे खूप आकर्षण आहे. भारतीय समाजात ब्राम्हण, क्षत्रिय यासारख्या उच्च वर्णाच्या व जातीच्या लोंकानी सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा याचा फार मोठा वाटा बळकावला आणि बहुसंख्य समाजाला या तीन्ही गोष्टींपासून वंचित ठेवले. अठराव्या शतकात समाजात स्वांतत्र्य, समता, व बंधुता यासारख्या लोकशाही मूल्यांची रूजवात झाल्यानंतर ही परंपरागत आणि उच्च—नीच भावाला बढावा (उत्तेजन) देणारी पराकोटीची विषमता असह्य झाली आणि त्यातून सामाजिक न्यायाची संकल्पना प्रचलित झाली. हा इतिहास बहुजन समाजाने विसरता कामा नये. 'समता' या तत्त्वाचा अभाव असल्याचे काय कारण आहे? वंश, जात, वर्ण, पंथ, लिंग यासारख्या पारंपारिक घटकांवर आधारीत असणाऱ्या समाजात वरच्या स्तरातील लोंकाना अधिकाधिक मान, सन्मान, प्रतिष्ठा व काही विशेषाधिकार प्राप्त झालेले होते. तर निम्न स्तरातील लोकांना व्यवसाय व अस्पृश्य माणून शिक्षणाच्या, आर्थिक विकासाच्या वाटा बंद केल्या होत्या. सामाजिक गुलामगिरी लादली होती. स्त्रियांचा दर्जा पुरूषांपेक्षा कमी होता. या विषमतेच्या तत्त्वावर समाजव्यवस्था आधारित होती. विकासाच्या संधी व सामाजिक प्रतिष्ठेपासून स्त्रियांना वंचित ठेवण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय या संकल्पनेतील सामाजिक बाजू अशा प्रकारच्या अनैतिक, अवैध व अमानुष भेदभाव, वंश, वर्ण, जात, लिंग, पंथ, व्यक्ती—व्यक्तीमध्ये भेदभाव करण्याचे निकष सामाजिक न्यायात बाद ठरविले आहे. याची जाणिव समाजातील उच्च विद्याविभूषीत व्यक्तीस असणे गरजेचे आहे. सामाजिक संबंध हे माणसांसाठी असतात. माणूस त्या संबंधासाठी असत नाही. म्हणून सामाजिक संबंधाची उभारणी नीतिमत्तेच्या आधारे व्हावी. सर्व स्त्री पुरूषांना समान न लेखणारा समाज किंवा व्यक्ती हा समाजिक न्यायाचा शत्रू आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी म्हटले आहे. पेरियार ई. वी. रामासामी यांनी म्हटल्यामुळे "जो लोग प्रसिद्धी, पैसा, पद पसन्द करते हैं; वे तपेदिक की घातक बिमारी की तरह हैं। वे समाज के हितों के विरोधी हैं।"

**निष्कर्ष:**

वरिलप्रमाणे म. ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय विषयक विचारांची व सांगितलेल्या संकल्पनेची किंवा दृष्टिकोनाची वस्तुस्थिती व फलश्रृती झाली किंवा नाही याचे संशोधन करणे आवश्यक आहे. म. फुलेनी सांगितलेल्या समतावादी दृष्टिकोनाची फलश्रृती समाधानकारक वाटत नाही. ज्या पुरूषप्रधान संस्कृतीला नकार देऊन म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री—पुरूष समानतेचा आग्रह धरला. त्याबाबत प्रत्यक्ष परीस्थिती बघितली असता त्यांच्या विचारांची, तत्त्वांची राख केल्यासारखी दिसून येते. स्त्रियांचे हक्क व त्यांच्यासोबत होणारे भेदभावपूर्ण वर्तन आजही दिसून येते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा अंतर्गत (**समता न्याय एकात्मता**) म. ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन समतावादी विचारांच्या दिपस्तंभाला साक्षी ठेवून मागासवर्गीय दुर्बल घटकांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व नैतिक विकास करण्याचे



Research Hub International Journal

महत्वपूर्ण कार्य या विभागा अंतर्गत केल्या जात आहे. आज या विभागा अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल, शेतमजूर व मागासवर्गीय घटकांच्या आर्थिक, सामाजिक व नैतिक विकासासाठी निवासी शाळा, वसतीगृह, स्वाधार योजना, शिष्यवृत्ती, घरकुल योजना अशा अनेक विकाससात्मक योजना चालविल्या जात आहेत. परंतु विविध विकासात्मक व शैक्षणिक प्रगतीकरीता योजनांचा फायदा काही लोकांनाच मिळत आहे. तर काही लोक/समाज अजूनही वंचित आहे. प्रशासनात स्वच्छ व नि:पक्षपातीपणे कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे अनेक भ्रष्टाचार होताना दिसून येत आहे. उदा. शिष्यवृत्ती घोटाळा, समता प्रतिष्ठान घोटाळा असे अनेक घोटाळे होण्यामागचे कारण शासन व प्रशासनात पारदर्शकता नसल्यामुळे तसेच शासकीय यंत्रणेद्वारे जे निर्णय घेतले जातात, त्यांची अंमलबजावणी करणारे अधिकारी व कर्मचारी जबाबदारपणे कार्य पार पाडण्यात कमी पडत असल्यामुळे असे घडत आहे. प्रत्येक शासक व प्रशासक शासन व प्रशासन चालवताना आपल्या कर्तव्याशी बांधील असला पाहिजे. प्रशासनात निर्णयांची, योजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे होण्यासाठी ते कर्मचारी किंवा अधिकारी हुशार, जबाबदार, कार्यक्षम, नि:स्वार्थी, प्रामाणिक, दुरदर्शी, उत्साही आणि निर्भिड अशा गुणांनी युक्त असले पाहिजे. तेव्हा समाजाचा, राज्याचा आणि दुर्बल घटकांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होईल. आजच्या परीस्थितीत अशा गुणसंपन्न अधिकाऱ्यांचा अभाव असल्यामुळे विभागात भ्रष्टाचाराचा बोलबाला सुरू आहे. समता व समावेशकता या घटकांचा समावेश प्रशासनात असणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**

- पाटील प्रा.बी टी – लोकशाही निवडणूक व सुशासन – फडके प्रकाशन, २०१८
- लोटे रा. ज. – भारतीय राजकीय विचार – मनोहर पिंपळापुरे, २०१४
- कुलकर्णी प्रा.बी. आय., सेट–नेट राज्यशास्त्र पेपर क्र.३, विद्याभारती प्रकाशन
- लोकराज्य एप्रिल २०१६
- https://thewire.in/caste/what-b-r-ambedkar-thought-of-the-word-dalit
- www.wikipedia

Research Hub International Journal